Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# ग्रामीण विकासात स्थानिक नेतृत्त्वाची भूमिका

**डॉ. वैद्य आर. जे.**
समाजशास्त्र विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना:**

ग्रामीण प्रशासन हे ग्रामातील लोकप्रतिनिधीमार्फत चालविले जाते. स्थानिक पातळीवर ग्रामपंचायत ही लोकशाही प्रशासनाची पहिली राजकीय व्यवस्थेची पायरी असते. ग्रामीण नेतृत्व आणि राजकारणाची ही प्राथमिक अवस्था असते. सर्वांगिण ग्रामविकासाच्या संदर्भाने ग्रामीण विकास व त्यातील स्थानिक नेतृत्वाची भूमिका हा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. ग्रामीण विकासातील समस्या ह्या स्थलपरत्वे बदलत असल्याने केंद्रीत नियोजन उपयोगी पडत नाही हे लक्षात आल्यानंतर भारतात १९६० नंतर पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. यानुसार लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. या अनुषंगाने ग्रामस्तरावर म्हणजेच स्थानिक पातळीवरील नेतृत्वाला सुद्धा महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण विकासात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरू लागली आहे. स्थानिक नेतृत्व राजकारणाद्वारे समाजपयोगी कार्य करेल ही त्यामागील प्रमुख भूमिका आहे.

मुळातच राज्यसंस्थेचे प्रयोजन हे समाजाच्या सुखी व समाधानी जीवनासाठीच आहे. ''राज्यसंस्थेची निर्मिती व्यक्तीचे जीवन सुखी आणि समाधानी करण्यासाठी झाली आणि व्यक्तिचे जीवन सुखी आणि समाधानी होईपर्यंत राज्यसंस्था अस्तित्वात राहील'' हे ग्रीक तत्वज्ञ ऑरिस्टॉटलचे विधान पूर्णपणे सत्य आहे. व्यक्तींची सर्वांगिण उन्नती करणे हेच राज्याचे अंतिम ध्येय असले पाहिजे ही विचारसरणी आज मान्य झाली आहे. आधुनिक काळात ग्रामीण राजकीय व्यवस्थेला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले असले तरी पंचायतराज व्यवस्था ही वेगवेगळ्या टप्प्यातून विकसित झालेली दिसून येते. यासंबंधी डॉ. एस. अखिलेश यांनी पुढील मत मांडले आहे :

''प्राचीन भारत की ग्राम पंचायते और गांधी जी के ग्राम स्वराज्य के विचार आधुनिक भारत नेतृत्व और बुद्धिजीवियों के लिये सदैव चिन्तन का विषय रहे है । प्राचीन काल मे ग्रामीण अंचल के समुदाय आत्मनिर्भर और स्वायत्त थे । केन्द्रीय सत्ता उनसे कुछ मात्रा में कर लेती थी किन्तु उनके नित्यप्रति के जीवन में उनका कोई हस्तक्षेप नही था । ग्रामपंचायते प्रशासन का काम करती थी । धीरे - धीरे पंचायतो का यह स्वरुप विलुप्त होता गया । राष्ट्रीय आंदोलन के दौरान महात्मा गांधी के मस्तिष्क मे भारत की भावी व्यवस्था का चित्र था । वे चाहते थे की स्वतंत्र भारत की राजनीतिक व्यवस्था लोकतांत्रिक विकेंन्द्रीकरण पर आधारित हो और गाँवमें आत्मनिर्भर तथा स्वायत्त ग्रामपंचायतों का गठण किया जाय । इसलिए भारतीय संविधान सभा के समक्ष यह सुझाव दिया गया था कि ग्राम पंचायतों को भारत की संवैधानिक व्यवस्था का आधार बनाया जाय और प्रान्तीय विधानसभाओं तथा केन्द्रीय संसद के निर्वाचनो के लिए उन्हें निर्वाचक मण्डल का रुप दिया जाय। किन्तु संविधान सभा ने इसे नही माना । इसलिए इसे राज्य के नीति निर्देशक तत्वों में रखा गया

और रह स्वीकार किया गया कि राज्य ग्राम पंचायतों का गठन करेंगे और उन्हे ऐसी शक्तियाँ प्रत्यायोजित करेंगे जिससे वे स्वशासन की इकाई के रुप मे कार्य कर सकें ।''

कुशल व सक्षम नेतृत्त्व ही समाजाची सर्वकालिक अनिवार्य गरज आहे. कोणताही समाज नेतृत्त्वहीन असत नाही. स्थल-कालानुरुप नेतृत्त्व प्रकार, कार्यशैली व स्वरुप बदलत गेलेले आहे. भारतीय ग्रामीण समाजातील स्थानिक नेतृत्त्व विकासाबद्दल स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक प्रयत्न केले गेले. सदरील प्रयत्नांचे डॉ. दादासाहेब मोटे व प्रा.अरुणा पाटील यांनी खालीलप्रमाणे विवेचन केले आहे.

''स्वातंत्र्यानंतरच्या काळात ग्रामीण समाजाचा विकास व्हावा, केंद्र व राज्यशासनाची ध्येयधोरणे ग्रामीण भागापर्यंत पोहोचावीत यादृष्टीने श्री. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींना अनुसरून त्रिसुत्री धोरणाची अंमलबजावणी केली. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका वा खंड स्तरावर पंचायत समिती आणि ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अशा तीन पातळ्यांवर पंचायत राज योजनेची अंमलबजावणी होण्यामधून ग्रामीण भागात सक्षम नेतृत्व निर्माण होईल अशी अपेक्षा होती. स्व. वसंतदादा पाटील, श्री. शरद पवार, श्री. विलासराव देशमुख, श्री. गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे नेतृत्व केंद्र स्तरापर्यंत पोहचले असले तरी ग्रामविकासाच्या निमित्ताने नेतृत्वाची जी एक फळी निर्माण व्हावयास हवी होती ती निर्माण होऊ शकली नाही. त्यामुळे ग्रामीण नेतृत्वाच्या संदर्भात समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.''

ग्रामीण राजकारण व नेतृत्वाच्या समस्यासंदर्भात दा.धो. काचोळे यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे :

''ग्रामीण राजकारणाचा कल व्यक्तिनिष्ठ, जातीय, धर्मीय, पंथीय, प्रादेशिक, भाषिक वगैरे प्रश्नांकडे झुकू लागला आहे. निखळ राजकारण जवळजवळ संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. कोणताही राजकीय पक्ष, राजकीय संघटना व व्यक्तीचे राजकारण या वरील बाबींचा आधार घेतल्याशिवाय टिकणे अशक्य झाले आहे. सार्वजानिक सुखसोयी नि हिताच्या गप्पा व चर्चा केली असतली तरी ती निव्वळ वरपांगी आणि दिखाऊ स्वरूपाची झाली आहे. ग्रामपंचायतीचे राजकारण एक गावापुरते मर्यादित असूनही येथे जात-धर्माचा आधार घेतला जातो. आपल्या जातीचे व धर्माचे लोक कोणत्या वस्तीत जास्त आहेत हे बघूनच उमेदवार निवडणूकीच्या आखाड्यात उतरतो. हीच पद्धत पंचायत समिती ते केंद्रीय स्तरापर्यंत उपयोगात आणली जाऊ लागली आहे.''

ग्रामीण भागात स्थानिक नेतृत्वावर काही सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांचा प्रभाव पडतो. त्याचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**जात आणि स्थानिक नेतृत्त्व :**

भारतीय ग्रामीण समाजव्यवस्थेत सर्व लोक निरनिराळ्या स्तरांमध्ये विभाजित झालेले दिसून येतात. हे विभाजन काही विशिष्ट घटकाच्या आधारावर झालेले असते. असे विभाजन जात या घटकावर आधारलेले असते तेंव्हा त्यास जातीव्यवस्था असे म्हणतात. भारतीय समाजाचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणून जातीसंस्थेचा उल्लेख केला जातो. आधुनिक काळातदेखील खेड्यांमध्ये जातीगटाला महत्त्व दिले जातांना दिसते. काही खेड्यात ज्या जातींच्या लोकांची वा कुटुंबांची संख्या जास्त त्यांचेच वर्चस्व सर्वत्र दिसून येते.

**लिंगभेद आणि स्थानिक नेतृत्त्व :**

पारंपारिक भारतीय समाजातील कुटुंबात स्त्रीचा दर्जा कनिष्ठ स्वरुपाचा होता. धार्मिकदृष्ट्या स्त्री ही वंदनीय समजली जात असली तरी तिची परिस्थिती केविलवाणी होती. स्त्री हा समाजाचा अर्धा भाग असल्यामुळे स्त्रियांना सर्व आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रक्रियांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. मुलगी, गृहिणी, पत्नी, आई या भूमिकेतच स्त्री बंदिस्त असलेली दिसून येते. परंतु कालपरत्वे ही स्थिती बदलत आहे. आधुनिक समाजात स्त्रीला जीवनाची सर्वच क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. शिक्षणामुळे तिच्या विचारात क्रांतिकारक बदल घडून आला असल्याने आपोआपच कुटुंबाचे रचनात्मक स्वरुप बदलले आहे.

**शिक्षण आणि स्थानिक नेतृत्त्व :**

शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे मुळ आहे. मानवी संपत्तीचा सर्वांगिण विकास घडवून आणणे, मानवाची कार्यक्षमता वाढवणे हे शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. ग्रामीण समाज आणि या समाजाचे नेतृत्त्व करणारे स्थानिक पातळीवरील नेते यांचा शिक्षणाकडे पहाण्याचा दृष्टीकोन सकारात्मक दिसून येतो. शैक्षणिक वातावरण निर्मितीत ग्रामीण नेतृत्त्वाचा सहभाग दिसून येतो. शिक्षित नेतृत्त्व असल्यास, शासनाकडून सुरु झालेल्या विविध विकास योजनांची माहिती घेऊन ती जनतेपर्यंत पोहचवणे, तसेच तालुका व जिल्हा पातळीवरील विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करणे; आपल्या नेमक्या गरजा त्यांना पटवून देणे शक्य होते. याचाच अर्थ शिक्षित स्थानिक नेतृत्त्व प्रशासन व जनता यांच्यातील योग्य मध्यस्थ म्हणून काम करु शकते.

**प्रशिक्षण आणि स्थानिक नेतृत्त्व :**

नवीन माहिती जाणून घेणे किंवा एखादे कौशल्य शिकण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. स्थानिक नेतृत्व हे सर्वच बाबतीत प्रगल्भ असेल असे नाही. विकास प्रक्रियेत सहभागी असणारे कर्मचारी आणि दुसऱ्या बाजूने ज्यांच्यासाठी विकास प्रक्रिया सुरु केली ती जनता यांच्यातील सर्वात महत्त्वाचा दूवा म्हणजे स्थानिक लोकप्रतिनिधीं होय. सध्याच्या भारतीय ग्रामीण समाजामध्ये अशिक्षित जनता, सतत प्रशिक्षणात गुंतून राहिलेले सरकारी कर्मचारी व कधीतरी एखाद्या प्रशिक्षण वर्गास जाऊन आलेले लोकप्रतिनिधी अशी विरोधाभास असलेली परिस्थिती आढळून येते. यामुळे स्थानिक नेतृत्व हे नवीन ज्ञान व दृष्टीकोनापासून वंचित राहते व परिणामी विकास कार्यास वेग येत नाही.

**लोकांचा ग्रामसभेतील सहभाग** :

भारतीय ग्रामीण समाजात लोकशाहीच्या माध्यमातून राजकीय मुल्ये मोठ्या प्रमाणात रुजली आहेत. राजकीय जागृती झालेली आहे. विविध राजकीय पक्ष आणि विविध पक्ष संघटना ग्रामीण भागात कार्यरत आहेत. त्याचा संपूर्ण समाजावर एक विशिष्ट प्रभाव दिसून येतो. विविध निवडणूका आणि गावात घेतली जाणारी ग्रामसभा यामध्ये लोक सहभागी होतात.

**उत्पन्न आणि नेतृत्त्व :**

'अर्थ' हा मानवी जीवनातील एक 'अर्थपूर्ण' घटक आहे. खेड्यातील नेतृत्त्व करणाऱ्यांची एक महत्त्वाची पात्रता म्हणजे त्या व्यक्तीची आर्थिक स्थिती होय. अद्यापही आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तिला महत्त्व

दिले जाते. बौद्धीक क्षमता, नितीमत्ता, समयसूचकता, दूरदृष्टी या गुणापेक्षा व्यक्तीची आर्थिक शक्ती किती प्रबळ आहे यावरच नेतृत्त्व अवलंबून असल्याचे दिसून येते.

**राजकीय पार्श्वभूमी :**

अलिकडच्या राजकीय चर्चेतील एक कळीचा मुद्दा म्हणजे राजकीय घराणेशाही. कुटुंबाची पार्श्वभूमी राजकीय असेल तर घरातील सदस्य स्थानिक, राज्य व राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्याची शक्यता जास्त असते. राजकारण हा सेवाभाव आहे हा संकेत नष्ट होत चालल्याने राजकारणाला व्यावसायिक रुप आले आहे. ज्याप्रमाणे व्यापाऱ्याचा मुलगा व्यापारी, डॉक्टरचा मुलगा डॉक्टर त्याचप्रमाणे राजकारणी व्यक्तीचा मुलगा राजकारणी हा संकेत बनला आहे.

**निष्कर्ष:**

या विश्लेषणातून भारतातील स्थानिक नेतृत्त्वाची स्थिती स्पष्ट होते. वर्तमान भारतीय ग्रामीण समाजात नेतृत्त्व करणारे नेते उपरोक्त पात्रता व क्षमता बाळगुण असल्याने सर्वसामान्य स्थितीतील व्यक्तिला स्थानिक पातळीवर नेतृत्त्व करण्याची संधी मिळत नाही हेच वास्तव आहे. ग्रामीण समाजात स्थानिक नेतृत्त्वाचा उदय हा मुख्यत्त्वे उच्च उत्पन्न गटातूनच होतो हे सत्य आहे. काही प्रमाणात शिक्षण, शासन यंत्रणा, राजकीय नेते व इतर संबंधित घटकाशी चांगले संबंध, थोड्याप्रमाणात उदार दृष्टीकोन हे स्थानिक नेतृत्त्वासाठी आवश्यक गुण असावयास हवेत हेच वरील विश्लेषणावरुन दिसून येते.

**संदर्भग्रंथसूची:**

१) धांगरेकर, चि.ग. (२०००) : ‘राजकीय समाजशास्त्र’, दत्तसन्स प्रकाशन, नागपुर, पृ.१४५.
२) एस. अखिलेश (२०००): ‘मध्यप्रदेश में पंचायती राज’, पंचायत राज एवं ग्रामीण विकास - संपा. डॉ. मनोज कुमार सिंह, आदित्य पब्लिशर्स, बीना (म.प), पृ.३२
३) मोटे दादासाहेब, पाटील अरुणा (२०१२) : ‘ग्रामीण समाजशास्त्र’, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१३८.
४) काचोळे, दा.धों (२००९) ‘सामाजिक संस्था आणि आधुनिकीकरण व ग्रामीण रुपांतर : प्रश्न आणि विकास’, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ. १९१
५) मोटे दादासाहेब, पाटील अरुणा (२०१२) : ‘ग्रामीण समाजशास्त्र’, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१३९.
६) शर्मा, वीरेन्द्र (१९९९) : ‘ग्रामीण समाजशास्त्र’, पंचशील प्रकाशन, जयपुर, पृ.३७५
७) शर्मा, राजेंद्र (१९९६) : ‘राजनैतिक समाजशास्त्र’, एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, पृ.२१४
८) कुराडे काकासाहेब (१९८१) : ‘शेतकी क्रांतीच्या दिशा’, नवसाहित्य प्रकाशन, समादेवी रस्ता, बेळगाव, पृ. २०.